| CNR No.MHKO200004182024 | दाखल तारीख | – | २३.१०.२०२४ |
|---|---|---|---|
| | नोंदणी तारीख | – | २३.१०.२०२४ |
| | निकाल तारीख | – | ०९.०४.२०२६ |
| | कालावधी | – | ०१ वर्ष ०५ महिने १६ दिवस |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कळे–खेरीवडे यांचे न्यायालयात**
**(पिठासिन अधिकारी व्ही.ए.लावंड–कोकाटे. )**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. २१७/२०२४**
**नि.क्र. ७/ब**

| | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्ष** | | महाराष्ट्र शासन तर्फे निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक, कोल्हापूर. |
| **अभियोग पक्षातर्फे** | | सौ. व्ही. डी. माने, सहा.सरकारी अभियोक्ता |
| **आरोपी** | | **संजय आनंदा काटकर**, व.व.५०,<br>रा. गणेश मंदीर जवळ, पोर्ले तर्फ बोरगाव,<br>ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर. |
| **आरोपीतर्फे वकील** | | श्री. व्ही. एस. पाटील |

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडलेचा दिनांक | | २४.०३.२०२३ |
| गुन्हा रजिस्टर क्रमांक | | १२८/२०२३ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल दिनांक | | २३.१०.२०२४ |
| प्ली नोंदविलेचा दिनांक | | १७.०७.२०२५ |
| साक्षीपुरावा सुरु झालेचा दिनांक | | १६.०३.२०२६ |
| युक्तिवाद दिनांक | | ०९.०४.२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | | ०९.०४.२०२६ |

| दोषसिध्दी व शिक्षेबाबत आदेश | | आरोपीची निर्दोष मुक्तता |
|---|---|---|

## आरोपींची माहिती

| अ.क्र. | आरोपीचे नांव | आरोपीस अटक दिनांक | आरोपीस जामिनावर खुले केलेचा दिनांक | दोषारोपा–तील कलम | आरोपीस दोषमुक्त किंवा दोषसिध्द केले | आरोपीस झालेली शिक्षा | फौ.प्र. सं.कलम ४२८ नुसार आरोपीने संपरिक्षे दरम्यान भोगलेली शिक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **संजय आनंदा काटकर** | फौ.प्र.सं कलम. ४१(अ), (१) प्रमाणे नोटीस | १७.०७ २०२५ | महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम चे कलम ६५(ई) प्रमाणे | निर्दोष मुक्तता | -- | --- |

## अभियोग पक्षातर्फे घेतलेल्या साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | साक्षीदाराचे नांव | निशाणी क्रमांक | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | विजय दगडू नाईक | ७ | तपास अधिकारी |

## अभियोग पक्षातर्फे सिध्द केलेले दस्तऐवज

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १. | १० | घटनास्थळ पंचनामा |
| २. | ११ | रासायनिक पृथ्थकरण अहवाल |

## मुद्देमाल

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १ | --- | एक प्लॅस्टीक कॅन ३५ लि. क्षमतेचा त्यामध्ये अं. २६ लि. गावठी हातभट्टी दारु |
| २ | --- | एक प्लॅस्टीक बादली, त्यात ०४ |

| | | |
|---|---|---|
| | | लि. गावठी दारुने भरलेली |
| ३ | --- | दोन काचेचे ग्लास गावठी दारूच्या वासाचे |

**– न्या य नि र्ण य –**

**(घोषित दिनांक ०९ एप्रिल, २०२६)**

आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९, चे कलम ६५ (ई) अन्वये अपराधाचा आरोप ठेवून प्रस्तुतचा खटला चालविण्यात आला.

**अभियोगपक्षाचे थोडक्यात कथन असे की :–**

**०२.** सचिन गजेंद्र काळेल, जवान, राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक, कोल्हापूर यांनी त्यांच्या फिर्याद मध्ये असे कथन केले आहे की, दिनांक २४/०३/२०२३ रोजी निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापूर यांनी अवैद्य धंदयाविरुध्द कारवाई करण्याबाबत मुखशिल आदेश दिले. त्यानंतर रेडिंग स्टाफ व दोन पंच यांना बोलवून घेतले व सांगितले की सातार्डे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर च्या हद्दीत विठ्ठल मंदिराजवळ, एका पत्र्याच्या शेडमध्ये एका इसमाच्या ताब्यात गावठी दारू विक्री करत असल्याचे मिळून आले. म्हणून त्याला त्याचे नांव विचारले असता त्याने त्याचे नांव संजय आनंदा काटकर, रा. गणेश मंदीर जवळ, पोर्ले तर्फ बोरगाव, ता.पन्हाळा जि. कोल्हापूर असल्याचे सांगितले. त्यानंतर तपासी अधिकारी व्ही. जे. नाईक यांनी सदर मुद्देमाल दोन पंचासमक्ष जप्त करुन जप्ती पंचनामा केला. त्यानंतर फिर्यादी यांनी आरोपीविरुध्द सरकारतर्फे फिर्याद दाखल केली.

**– अन्वेषण व दोषारोप –**

**०३.** दिनांक २४.०३.२०२३ रोजी, सचिन गजेंद्र काळेल, जवान,

राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक, कोल्हापूर यांनी वर्दी दिली, त्याने ती नोंदविली व त्यावरुन दखलपात्र अपराध घडल्याचे निदर्शनास आल्यामुळे पहिली खबर क्रमांक – १२८/२०२३ वरील कलमखाली नोंदविण्यात आली. सदर गुन्हयाचा तपास श्री. व्ही. जे. नाईक, तपास अधिकारी यांनी केला. अन्वेषना दरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यात आले. मुद्देमाल जप्त केला व घटनास्थळ पंचनामा तयार केला. वरील आरोपीविरुध्द तपास पुर्ण केल्यानंतर फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १७३ अन्वये अंतिम अहवाल न्यायालयात दाखल करण्यात आला. चौकशी दरम्यान आरोपीस वैयक्तीक जातमुचलक्यावर खुले करण्यात आले होते.

०४. अंतिम अहवाल व इतर कागदपत्रे पाहिल्यानंतर आरोपीची प्ली **(नि.क्र.०७)** वर नोंदवण्यात आली. सदरची प्ली आरोपीला वाचून दाखविण्यात आली व समजावून सांगण्यात आली. आरोपीने सदर अपराध कबुल नाही असे नोंदविले व त्यांच्याविरुध्द संपरिक्षा चालविण्याची मागणी केली. अभियोगपक्षातर्फे दुय्यम निरीक्षक, विजय दगडू नाईक **(अ.सा.क्र.२/नि.०७ सोबत)** यांना तपासण्यात आले. अभियोग पक्षातर्फे नि.क्र. १ वरील आदेशा अन्वये पुरावा बंद करण्यात आला. अभियोग पक्षाच्या पुराव्याचे अवलोकन केले असता आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने आरोपीची फौ. प्र. सं. कलम ३१३(१)(ब) प्रमाणे निवेदन नोंदवण्यात आले.

**– <u>मुद्दे व निष्कर्ष</u> –**

०५. अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील सौ. व्ही. डी. माने व आरोपीतर्फे विद्वान वकील श्री. व्ही. एस. पाटील यांचा युक्तिवाद ऐकला. वरील सर्व बाबींचा विचार केल्यानंतर व दोन्ही पक्षांचा सखोल युक्तीवाद ऐकल्यानंतर खालीलप्रमाणे निर्णयीत करावयाचे मुद्दे उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष

खालीलप्रमाणे नोंदविण्यात येत आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, कथित तारीख, ठिकाण आणि वेळेस, आरोपी विनापरवाना बेकायदा विदेशी दारु विक्री करण्याच्या उद्देशाने कब्जात बाळगुन मिळून आला, आणि त्यानुसार आरोपीने महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, १९४९, कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा केला? | ...नाही |
| २. | कोणता आदेश ? | ...आरोपीची निर्दाष मुक्तता करण्यात येते. |

## – <u>कारणमिमांसा</u> –

### <u>मुद्दा क्रमांक १ करिता:–</u>

**०६.** अभियोग पक्षातर्फे केवळ दुय्यम निरीक्षक, विजय दगडू नाईक **(अ.सा.क्र.२/नि.क्र.७)** यांचा जबाब नोंदविण्यात आला. त्यांनी त्यांचा जबाबत असे कथन केले आहे की, ते दि. २४.०३.२०२३ रोजी राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक, कोल्हापूर येथे दुय्यम निरीक्षक या पदावर कार्यरत होते. त्यादिवशी खबरी मार्फत त्यांना बातमी मिळाली की, पोर्ले तर्फे बोरगावच्या हद्दीत गणेश मंदीराजवळ एक इसम बेकायदेशीररित्या गावठी हातभट्टीच्या दारुची विक्री करत आहे अशी बातमी मिळाली होती. त्यानंतर त्यांनी कारवाई करण्याचे आदेश दिले. त्याप्रमाणे त्यांनी दोन पंचाना बोलावून घेतले. त्यानंतर रेडींग स्टाफ व पंच सरकारी वाहनाने घटनास्थळी पोहोचले व १२.०० च्या सुमारास छापा टाकला. तेथे त्यांना एक इसम मिळून आला त्याने त्याचे नाव संजय आनंदा काटकर असल्याचे सांगितले त्याच्या ताब्यात एक प्लॅस्टीकची बादली, दोन काचेचे ग्लास, २६ लि. देशी दारू मिळून आले. त्यानंतर दुय्यम निरीक्षक यांनी पंचनामा करुन मुद्देमाल जप्त करुन

घेतला. त्यानंतर फिर्यादीने आरोपी विरुध्द फिर्याद दाखल केली. त्यांनी त्यांचे सरतपासादरम्यान आरोपीस ओळखतात. सरतपासादरम्यान आरोपी न्यायालयात हजर होता. त्यांनी त्यांचे उलटतपासात असे मान्य केले आहे की, दि.२४.०३.२०२३ रोजी त्यांचे वरिष्ठांनी दिलेला आदेश हा मौखिक स्वरुपाचा होता. ते ज्या सरकारी वाहनाने घटनास्थळी गेले होते त्या वाहनाचा लॉग बुकचा उतारा त्यांनी फिर्याद देताना हजर केलेला नव्हता. त्यांनी छापा टाकण्यापूर्वी बनावट गि–हाईक पाठवून दारु विक्रीची खात्री केली नव्हती. तसेच त्यांनी कारवाईच्या वेळी आरोपीचे आधारकार्ड व मतदार ओळखपत्र पाहिले नव्हते. त्यांनी उर्वरीत प्रश्नाना नकारार्थी उत्तरे नोंदवली आहेत.

**०७.** अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या एकमेव साक्षीदाराच्या कथनाचे अवलोकन केले असता असे स्पष्ट होते की, तपासी अधिकारी विजय नाईक **(अ.सा.क्र.२/नि.क्र.७)** हे तपासी अधिकारी असून फक्त त्यांची एकट्याची साक्ष आरोपीविरुध्द गुन्हा शाबीत होण्याकरीता पुरेशी नाही. अभियोग पक्षातर्फे मुद्देमाल जप्ती पंचनामा शाबित करण्यात आलेला नाही. तसेच घटनास्थळावरील कोणताही प्रत्यक्षदर्शी त्रयस्त साक्षीदार तपासल्याचे दिसून येत नाही. अशा परिस्थितीत आरोपीविरुध्द विषयांकीत गुन्हा अभियोग पक्षाने रास्त शंकेपलिकडे जावून सिध्द केलेला नाही. सदर गुन्हयातील पंचनामा व त्यातील मजकूर सिद्ध झालेचे दिसून येत नाही. तसेच सदर कामी प्रयोगशाळेचा अहवाल देखील सामील केलेला दिसून येत नाही. त्यामुळे आरोपी हा देशी दारु जवळ बाळगून विक्री करण्याच्या उद्देशाने मिळून आला असे अभियोग पक्ष ठोस पुराव्यानिशी शाबीत करु शकलेला नाही. त्यामुळे सदर आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. म्हणून मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

## <u>मुद्दा क्रमांक २ करिता–</u>

०८. मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविला असल्याने निर्दोष होण्यास पात्र आहे. प्रस्तुत कामी पिडीत अगर नुकसानग्रस्त कोणीही नसलेने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३५७–अ प्रमाणे नुकसान भरपाई देण्याची आवश्यकता नाही. जप्त मुद्देमाल देशी दारू जी एम डॉक्टर कंपनीच्या १८० मिलीच्या २० बाटल्या या अपिल कालावधीनंतर राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, कोल्हापूर यांचेकडे योग्य त्या निर्गतीसाठी पाठविणे उचित होईल. म्हणुन मी मुद्दा क्र.२ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | आरोपी **संजय आनंदा काटकर** यांची महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, १९४९, चे कलम ६५ (ई) अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केल्याचे सिध्द न झाल्याने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५ (१) अन्वये त्यांची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| २. | आरोपीचे बंधपत्र व जामीन कतबा रद्द करण्यात येत आहे. |
| ३. | आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७ (अ) प्रमाणे मा. अपिल न्यायालयासमोर उपस्थीत होण्यासाठी रक्कम रुपये १५,०००/– वैयक्तीक जातमुचलका लिहून दयावा. |
| ४. | जप्त मुद्देमाल एक प्लॅस्टीक कॅन ३५ लि. क्षमतेचा त्यामध्ये अंदाजे २६ लि. गावठी हातभट्टीची दारू या अपिल कालावधीनंतर राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, कोल्हापूर यांचेकडे योग्य त्या निर्गतीसाठी पाठविण्यात यावा. तसेच एक प्लॅस्टीक बादली त्यात ०४ लि. गावठी दारूने भरलेली व दोन काचेचे ग्लास अपिल कालावधीनंतर नियमाप्रमाणे नाश करणेत यावेत. |
| ५. | मा. उच्च न्यायालय मुंबई यांचेकडील रंजना शांतिलाल |

| | |
|---|---|
| | सुर्यवंशी विरुध्द जयप्रकाश तुळशीराम गुप्ता क्रिमी.अपिल (एस.टी.) नंबर ३९०/२०१९ या न्यायनिवाडयात निर्देशित केलेप्रमाणे प्रस्तुत न्यायनिर्णयाची प्रत जिल्हाधिकारी कोल्हापूर यांचेकडे पाठविणेत यावी. |

(**न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.**)

VAISHALI Digitally signed by VAISHALI
Date: 2026.04.09 17:35:21 +0530

कळे–खेरीवडे.
दिनांक. ०९.०४.२०२६

(**व्ही.ए.लावंड–कोकाटे**)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
कळे–खेरीवडे.